# जिल्हा परिषद रत्नागिरी

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन,
माळनाका रत्नागिरी ४१५६१२

## आरोग्य विभाग

## बेटी बचाओ, बेटी पढाओ

दुरध्वनी क्रमांक 02352-221403

ईमेल आयडी dhozpratnagiri@gmail.com

जा.क्र.रजिप/आवि/आस्था-१०/नियुक्ती आदेश/ 7119 ते 7124 /२०२४ दिनांक 18 OCT 2024 /१०/२०२४

**वाचा :-**

१) महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम १९६७
२) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. अनिओ/१००५/१२६/सेवा - ४/दि. ३१.१०.२००५.
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. प्रनिमं २००७/प्र.क्र ४६/०७१३-अ दि. १९.१०.२००७
४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआर व्ही- २०१२/प्र.क्र १८६/१२ दि. २८.०२.२०१३
५) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. प्रनिमं २००७/प्र.क्र ४६/०७/१३-अ. दि. २७.०६.२००८
६) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. प्रनिमं १२१४/प्र.क्र ४३/०७/ १३-अ. दि. ०५.०६.२०१४
७) शासन परिपत्रक, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्र एपीटी-२०१४/ प्र.क्र १३९/ आस्था-८ दि. ०५.०७.२०१४
८) महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. आनियो-२०१५/प्र.क्र.६२/वित्त-५ दि. १३ जून २०१७
९) महाराष्ट्र शासन सा.प्र.विभागाकडील शासन निर्णय क्र.चारित्र्य-२११७/प्र.क्र. ४८३/२०१७ १६.अ.दि.२८ ऑगस्ट २०१७
१०) महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र. प्राणिमं १२२२/प्र.क्र. ५४/का-१३-अ मुंबई दि. ४ मे २००५
११) शासन निर्णय ग्रामविकास विभाग संकीर्ण २०२२ प्र.क्र ११/आस्था -८ दिनांक १० मे २०२२
१२) शासन निर्णय वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र. पदनि २०२२/प्र.क्र.२ / २०२२. आ.पु.क. दि. ३० सप्टेंबर २०२२
१३) शासन निर्णय, ग्राम विकास विभाग निर्णय क्र. संकीर्ण -२०२२/ प्र.क्र११/आस्था-८ दि. २१ ऑक्टोबर २०२२
१४) शासन निर्णय वित्त विभागाचे शासन निर्णय क्र.पदनि-२०२२/ प्र.क्र.२०/२०२२ आ.पु.क.दिनांक ३१.ऑक्टोबर २०२२
१५) शासन निर्णय ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्र.संकिर्ण २०२२/प्र.क्र.११/आस्था-८ दि.१५ नोव्हेंबर २०२२
१६) शासन निर्णय प्रशासन विभाग निर्णय क्र. प्रानिम /१२२२/प्र.क्र.१३६/का-१३ ब दि.१५ नोव्हेंबर २०२२
१७) शासन निर्णय ग्रामविकास विभाग शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०२२/प्र.क्र११/आस्था-८/दि. १५ मे २०२३
१८) जिल्हा परिषद रत्नागिरी पदभरती २०२३ जाहिरात क्र. ०१/२०२३
१९) जिल्हा निवड समिती सभा दि. २६ /०७/२०२४
२०) मा.अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्या मान्यतेने प्रसिध्द केलेली निवड यादी दि. २६/०७/२०२४
२१) मा. जिल्हाधिकारी कार्यालय धाराशिव (पुनवर्सन विभाग) जिल्हाधिकारी कार्यालय, परिसर धाराशिव या कायालयाकडील जा.क्र. २०२४/पुनर्वसन/प्रग्रप्र/पडताळणी/सिआर-०३ दि. १२.०९.२०२४
२२) महिला व बाल विकास, आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, पुणे -१ यांचे जा.क्रमबाविआ/बावि/का-५/अनाथ प्रमाणपत्र पडताळणी/२०२३-२४/५९०८/२०२४ दि. १८.०९.२०२४ चे पत्र
२३) या कार्यालयाकडील मंजूर टिपणी दिनांक ०८/१०/२०२४

**आदेश,**

जिल्हा निवड समिती रत्नागिरी यांचेकडून शिफारस केलेल्या खालील उमेदवारांची जिल्हा तांत्रिक सेवा (गट-क आरोग्य श्रेणी - २ **औषध निर्माण अधिकारी** या पदावर सुधारीत सातव्या वेतन आयोगानुसार **PAY BAND PB 2 रुपये २९२००-९२३०० मधील एस - १०** या वेतन श्रेणीमध्ये वेतन आणि प्रचलित नियमानुसार अनुज्ञेय महागाई भत्ता व इतर भत्ते मध्ये नियुक्ती करण्यात येऊन त्यांची पदस्थापना जिल्हा परिषद रत्नागिरी अंतर्गत त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी रिक्त पदावर करण्यात येत आहे.

| अ. क्र | उमेदवारांचे नाव | मुळ प्रवर्ग | निवडीचा प्रवर्ग | समांतर आरक्षण | नेमणुकीने दिलेले ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्रीम. राधीका तायाप्पा छबीले | खुला | खुला | समांतर आरक्षण प्रकल्पग्रस्त | प्रा.आ.केंद्र, रिंगणे, ता. लांजा |
| २ | श्री. शुभम संतोष शिंगणापूरे | आदुघ | खुला | समांतर आरक्षण अनाथ | प्रा.आ.केंद्र ,माखजन,ता.संगमेश्वर |
| ३ | श्री. संकेत श्रीकांत तानवडे | इमाव | इमाव | समांतर आरक्षण विरहीत | प्रा.आ.केंद्र , कुंभवडे, ता.राजापूर |
| ४ | श्रीम. स्वप्नाली दिपक कांबळे | अनु जाती | अनु जाती | समांतर आरक्षण महिला | प्रा.आ.केंद्र,सायले,ता. संगमेश्वर |
| ५ | श्री. रुबेन शमुवेल रुकडीकर | खुला | खुला | समांतर आरक्षण विरहीत | प्रा.आ.केंद्र ,फणसे,ता.राजापूर |

**उपरोक्त उमेदवारास शासनाच्या तसेच जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून नेमणूक देणेत येत आहे.**

१) वरील उमेदवारांनी नेमणूकी संदर्भात सादर केलेली माहिती व कागदपत्रे खोटी आढळून आल्यास, त्यांची नेमणूक कोणतीही लेखी पूर्व सूचना न देता रद्द करणेत येऊन त्यांचे विरुध्द कायदेशीर कारवाई केली जाईल.

२) वरील उमेदवारांना एका पेक्षा अधिक पती/ पत्नी असता कामा नये. तसेच साप्रवि कडील शासन परिपत्रक दिनांक २८ मार्च २००५ व परिपत्रक क्र. एसआरव्ही २०००/प्र.क्र.१७/२०००/१२ दिनांक १ जुलै २००५ नुसार महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतीज्ञापत्र) नियम २००५ मधील तरतुदींचे पालन करणे बंधनकारक आहे.

३) उमेदवाराची नियुक्ती ही पोलीस खात्याकडून आपले पुर्व/ चारित्र्य व वर्तणूक अहवाल प्राप्त होण्याच्या अटीस अधिन राहून करणेत येत असून पोलीस खात्याचा अहवाल प्रतिकूल आलेस संबंधीत उमेदवारास जिल्हा परिषद सेवेतून कोणतीही नोटीस न देता तात्काळ कमी करणेत येईल.

Scanned with OKEN Scanner

४) वरील उमेदवारांनी शारिरीकदृष्ट्या नोकरी करणेस पात्र असले बाबतचा जिल्हा शल्य चिकित्सक रत्नागिरी यांचा दाखला हजर झाले तारखेपासून जास्तीत जास्त एक महिन्याच्या आत देणेचा आहे. वैद्यकिय प्रमाणपत्रानुसार जिल्हा परिषदेच्या सेवेत अपात्र आढळून आल्यास अपात्र ठरविल्या दिनांकापासून सेवा संपुष्टात आणली जाईल.

५) महाराष्ट्र शासन सा.प्र.विभागाकडील शासन निर्णय क्र.प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९ दि.१९.३.२००३ तरतुदीनुसार संगणक अर्हता प्रमाणपत्र नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून २ वर्षाच्या आत प्राप्त करणे बंधनकारक राहील अन्यथा सेवा समाप्त करणेत येईल,

६) ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन परिपत्रक क्र. जिपथ ०७११/प्र.क्र.११३/११/आस्था-१४. दि.२९.९.२०१ अन्वये व त्या नंतर वेळोवेळी निर्गमित केले शासन शुध्दीपत्रकानुसार नेमणूक झालेल्या पदावर किमान ०३ वर्ष सेवा पूर्ण झाल्याशिवाय त्यांना अन्य जिल्हा परिषदेमध्ये आंतर जिल्हा बदलीने नेमणूक देण्यासाठी विचार करण्यात येणार नाही. याबाबत सहमत असल्याबाबत हजर होते वेळी संबंधीतांला संमतीपत्र कार्यालय प्रमुखाकडे लेखी लिहून दयावे लागेल.

७) उमेदवारास नोकरी सोडावयाची झालेस त्यांनी एक महिन्याची आगाऊ नोटीस किंवा नोटीस ऐवजी एक महिन्याचे वेतना इतकी रक्कम शासन खाती भरणा करावी लागेल.

८) नेमणूकीच्या ठिकाणी हजर होणेसाठी प्रवासभत्ता व अन्य कोणत्याही प्रकारच्या सवलती मिळणार नाहीत.

९) भारतीय घटनेशी एकनिष्ठ राहण्याची शपथ घ्यावी लागेल.

१०) उमेदवारांनी हा आदेश मिळालेपासून ३० दिवसांचे आत नेमणूकीचे ठिकाणी हजर होणेचे आहे. यामध्ये संबंधित उमेदवाराकडून कसूर अगर दुर्लक्ष झालेस त्यांचा नेमणूकीचा आदेश रद्द केला जाईल.

११) उमेदवारांनी नोकरीवर हजर होणेपूर्वी अन्यत्र कोठे सेवेत असलेस त्या सेवेचा राजीनामा देऊन तो रितसर मंजूर करून घेवूनच हजर होणेचे आहे. त्याचप्रमाणे नोकरीवर हजर होताना आयकार्ड साईजचे दोन फोटो संबधित कार्यालयाकडे सादर करणेचे आहे.

१२) सदर नियुक्ती धारकांना भविष्यात वेळोवेळी विहित करण्यात येणाऱ्या, भ.नि.नि., सेवा निवृत्ती वेतन इ.बाबत शासन जे जे आदेश निश्चित करेल त्या सर्व सेवा शर्ती बंधनकारक राहतील.

१३) रत्नागिरी जिल्हयात कोठेही दुर्गम भागात नेमणूक दिलेस तेथे हजर व्हावे लागेल. नेमणूकीने दिलेले ठिकाण बदलून मिळणेबाबत कोणीही प्रयत्न करणेचा नाही. तसे केलेचे आढळून आलेस नेमणूक रद्द करणेस पात्र ठरेल.

१४) दि. १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर जिल्हा परिषदेच्या सेवेत नियुक्त झालेल्या / होणा-या सर्व कर्मचा-यांना (शिक्षक वगळून) राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना लागू होईल. सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ आणि सद्या अस्तित्वात असलेली सर्व साधारण भ.नि.नि. योजना लागू होणार नाही.

१५) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. बीसीसी २०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दि.१२ डिसेंबर २०११ अन्वये ज्या उमेदवाराची निवड मागास प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झाली. व ज्यांच्या जाती दाव्याची पडताळणी झालेली नाही. अशा उमेदवारास त्यांच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहून तात्पुरती नियुक्ती देण्यात आलेली आहे.नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर अशा उमेदवारांनी नियुक्ती आदेशांच्या दिनांकापासून ६ महिन्याच्या आत आपल्या जात पडताळणी पत्राची वैधता संबधित जात पडताळणी समिती कडून करुन घेणे आवश्यक राहील. नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठी प्रस्ताव संबधित जात पडताळणी समितीकडे सादर करावा लागेल. जात पडताळणी समितीने दिलेल्या पोहोच पावतीची साक्षांकित प्रत करावी लागेल. जात पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर नियुक्ती आदेश त्वरीत रद्द करण्यात येईल. अशा उमेदवारांविरुध्द महाराष्ट्र अनुसुचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास वर्ग, जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियम अधिनियम २००० मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल. याचिका क्र. २१३६/२०११ व अन्य याचिकांवर मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक २५ ऑगस्ट २०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालय दिल्ली येथे एस एल पी दाखल करण्यात आली आहे. यावर मा. सर्वोच्च न्यायालयाकडून जे काही आदेश दिले जातील त्या आदेशाच्या अधिन राहून सदर नियुक्ती आदेश देण्यात येत आहे.

१६) उमेदवाराने सदर पदाचा कार्यभार धारण केल्याच्या दिनांकापासून १ वर्ष कालावधी हा परिविक्षाधीन कालावधी राहील परिविधाधीन कालावधीत कामाचा अपेक्षित दर्जा प्राप्त न केल्यास किंवा वर्तणुक समाधानकारक न आढळल्यास त्यांची सेवा संपुष्ठात आणण्यात येईल.किंवा परिविक्षाधीन कालावधी नियमानुसार वाढविण्यात येईल.

१७) महाराष्ट्र जिल्हा परिषद (जिल्हा सेवा) प्रवेश नियम १९६७ मधील ६(६) अन्वये उमेदवाराचे एक वर्षापेक्षा कमी नसेल इतकी अखंड मुदतीसाठी या पदावर समाधानकारकरित्या सेवा केल्यास किंवा परिविक्षेची मुदत समाधानकारकरित्या पुर्ण केली असेल आणि विभागीय परिक्षा किंवा इतर कोणताही असल्यास भाषा परिक्षा उर्तीर्ण झाली असेल तो किंवा हे पद धारण करण्याकरिता शासनाने ठरविलेले (असल्यास) प्रशिक्षण उमेदवाराने यशस्वीरित्या घेतलेले असल्याशिवाय उमेदवारास जिल्हा सेवेतील पदावर कायम करण्यात येणार नाही.

१८) संबधित उमेदवार यांना नियुक्तीच्या ठिकाणी मुख्यालय वास्तव्य करणे बंधनकारक राहील.

१९) सदर आदेशाने औषध निर्माण अधिकारी पदावर नियुक्ती दिल्यानंतर संबधितांचे नियुक्ती बाबत कोणी आक्षेप घेतल्यास व प्राथमिक चौकशी अंती त्यात तथ्य दिसून आल्यास अगर नियुक्तीचे वेळी /नियुक्ती साठी सादर केलेली माहिती चुकीची आढळून आल्यास दिलेली नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर व कोणत्याही वेळी रद्द करण्यात येईल.

२०) शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या प्रशिक्षणास हजर राहून यशस्वी रित्या पुर्ण करावे लागेल.अन्यथा वेतनवाढ काढली जाणार नाही.

२१) उमेदवाराने नियुक्ती वेळी सादर केलेल्या नॉनक्रिमिलेअर (एन.सी.एल.) प्रमाणपत्राच्या पडताळणीस अधिन राहून नियुक्ती देण्यात येत आहे.सदर प्रमाणपत्र अवैध ठरल्यास आपली सेवा समाप्ती करण्यात येईल.

२२) वरील उमेदवार हिंदी व मराठी भाषा संबधीच्या नियमावलीनुसार जर या अगोदर उर्तीण झालेला नसल्यास किंवा उर्त्तीण होण्यापासून सुट मिळाली नसेल तर त्यांनी एतदर्थ मंडळाची मराठी व हिंदी भाषा विषयाची परिक्षा विहित मुदतीत उर्तीण होणे आवश्यक राहील.

२३) उमेदवारास नोकरीत असताना पुर्व परवानगी शिवाय दुसरीकडे नोकरी / व्यवसाय स्विकारता येणार नाही.

२४) सेवेच्या सर्वसाधारण शर्तीच्या अनुषंगाने शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सेवा शर्ती बंधनकारक राहतील.

२५) शाळा सोडल्याचे प्रमाणपत्रात नोंदविण्यात आलेली जन्मतारीख ही बरोबर असून त्याबाबत त्यांनी कोणतीही तक्रार नसल्याचे प्रमाणपत्र कार्यालयास त्वरीत सादर करावे लागेल. मुळ सेवा पुस्तकात करण्यात आलेली जन्मतारखेची नोंद उमेदवाराने नेमणूक स्विकारल्यापासून पाच वर्षानंतर बदलण्यात येणार नाही.

Scanned with OKEN Scanner

२६) ज्या उमेदवारांची दिव्यांग प्रवर्गातून निवड झालेली आहे, अशा उमेदवारांनी शासन सेवेसाठी वैदयकीय दृष्टया पात्र असल्याबाबतचे प्रमाणपत्र वैदयकीय मंडळाकडून प्राप्त करुन घेऊन ते कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील. उमेदवार जिल्हा अंतर्गत कोठेही बदलीस पात्र राहिल.

२७) आदेशातील संदर्भ क्र.१ ते १७ मधील सेवा प्रवेश नियम, शासन मार्गदर्शक सूचना, शासन निर्णय व परिपत्रकातील लागू होत असलेल्या सर्व अटींची व शर्तीची पूर्तता करणे बंधनकारक राहील.

२८) हजर होताना नियमानुसार रु. १००/- चे प्रतिज्ञापत्रावर नियुक्ती आदेशातील सर्व अटी मान्य असले बाबत लेखी करारपत्र (अॅग्रीमेंट) संबंधित अधिकारी / कार्यालय प्रमुखांकडे द्यावे लागेल.

(किर्ती किरण पुजार, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद रत्नागिरी

प्रति,

-----------------------------------

-----------------------------------

प्रत माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी :-

१) मा. अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी, रत्नागिरी, यांना माहितीस्तव सादर.
२) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी
३) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.), जिल्हा परिषद, रत्नागिरी
4) जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी रत्नागिरी
५) गट विकास अधिकारी, पंचायत समिती .......
६) तालुका आरोग्य अधिकारी , पंचायत समिती .......
७) वैदयकीय अधिकारी, ........

२/- कार्यालय प्रमुख यांना सूचित करण्यात येते की, आदेशात नमूद अटी शर्तीनुसार पुर्तता करुन उमेदवाराची सर्व मुळ प्रमाणपत्राची पडताळणी करुन कामावर रुजू करुन घेवून अहवाल सादर करावा. सदर उमेदवार मुरदतीत हजर न झाल्यास तसेच तात्काळ कळवावे. (तसेच नियुक्ती आदेशातील अट ६ व २८ प्रमाणे कार्यवाही करावी.)

८) आदेश संचिका

(किर्ती किरण पुजार, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद रत्नागिरी

Scanned with OKEN Scanner